| CNR No.MHWR040004492020 | नोंदणी दिनांक | – | ०१/०७/२०२० |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | ०१/०७/२०२० |
| | निकाल दिनांक | – | ०७/०५/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०५ १० ०६ |

निशाणी क्र. ०२ पुढे

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक ०७/०५/२०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६९/२०२०)**

गुन्हा नोंद क्र. २१८/२०२०, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्री. व्ही.व्ही.डोरले |
| **आरोपी** | १.<br><br>२.<br><br>३. | **पांडुरंग नारायण वाहीलकर,**<br>वय – ६७ वर्षे, व्यवसाय – काही नाही,<br>**ज्ञानेश्वर उर्फ बबलू नारायण वाहीलकर,**<br>वय – ४८ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>**निशीकांत पांडुरंग वाहीलकर,**<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>सर्व रा. वार्ड क्र.२, वडगांव(कला), ता. सेलु, जि. वर्धा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. के.डब्लू.मगरे |

## भाग – ब

### (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २०/०५/२०२० ते २१/०५/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २१/०५/२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०१/०७/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०७/०२/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०७/०२/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०७/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पांडुरंग नारायण वाहीलकर | २६/०५/२०२० | २६/०५/२०२० | भा.दं.वि. कलम २९४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | ज्ञानेश्वर उर्फ बबलू नारायण वाहीलकर | २६/०५/२०२० | २६/०५/२०२० | भा.दं.वि. कलम २९४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | निशीकांत पांडुरंग वाहीलकर | २६/०५/२०२० | २६/०५/२०२० | भा.दं.वि. कलम २९४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.

अ.अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | बेबी तुकाराम भट | फिर्यादी | निशाणी क्र.०२ पुढे |
| २. | लक्ष्मण गजानन कुमरे | घटनास्थळ पंच | निशाणी क्र.०२ पुढे |
| ३. | पुरुषोत्तम मारोती अवघडे | घटनास्थळ पंच | निशाणी क्र.०२ पुढे |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

क. न्यायालयीन साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०५ | तोंडी रिपोर्ट |
| २. | निशाणी क्र.०६ | छापील प्रथम खबरी अहवाल |

ड. भौतीक वस्तु

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | ---- | ---- |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : ०७/०५/२०२६)**

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे** –

२. दि. २०/०५/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी हिने आरोपींना म्हटले की, “तुमच्या बांधकामाचे पाणी माझा भिंतीला मुरुण माझा घरात जमा झाले आहे”. त्यावेळी फिर्यादीच्या घरासमोरील सार्वजनिक रोडवर आरोपी पांडुरंग वाहीलकर, बबलू वाहीलकर व निशीकांत वाहीलकर हे आले व आरोपी क्र.१ याने फिर्यादीला,”साली लवडी तु माजली हे काही झाले नाही तुया गांडीत पाणी मुरवतो साली छिणाल रांड” अश्या अश्लील शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र.२ याने त्याचे अंगावरील कपडे काढुण फिर्यादीला म्हटला की,”तु माझे शेट्ट उपडुण घे हेपराचोदे” असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र.३ हा फिर्यादीच्या अंगावर येवुन फिर्यादीला म्हटला की, “घरात पाणी काही झाले नाही, तुझा गांडीत पाणी भरतो” अशी अश्लील शिवीगाळ करुन फिर्यादीला म्हटले की,”तुझा मागे पुढे कोणी नाही तुला मारुन टाकले तरी आमचे काही वाकडे होत नाही, दोन चार एकर वावर विकुन पैसे लावील” अशी धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे तक्रार दिली. सदरची तक्रार पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.२१८/२०२० भारतीय दंड विधानाचे कलम २९४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. राजेश कंगाले यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला. आरोपींना अटक करुन अटक फार्म तयार केले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम २९४, ५०६ अन्वये आरोप ठेवुन निशाणी क्र. ०२ पुढे आरोपींचा तपशील नोंदविला. त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व त्यांना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपींनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपींविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत पुरावा अभिलेखावर आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान निशाणी क्र.०२ पुढे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्या बचावात खोटी केस केल्याचे तसेच त्यांना काही माहित नसल्याचा बचाव घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.व्ही.डोरले तसेच आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. के.डब्लू.मगरे यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे निश्चीत केलेले आहेत. सदरचे मुद्दे, कारणमिमांसा निष्कर्षासह खालील प्रमाणे :

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक २०/०५/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान वडगांव(कला), ता.सेलू, येथे आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी आरोपी क्र.१ याने फिर्यादीला,"साली लवडी तु माजली हे काही झाले नाही तुया गांडीत पाणी मुरवतो साली छिणाल रांड" अश्या अश्लील शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र.२ याने त्याचे अंगावरील कपडे काढुण फिर्यादीला म्हटला की,"तु माझे शेट्ट उपडुण घे हेपराचोदे" असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र.३ हा फिर्यादीच्या अंगावर येवुन फिर्यादीला म्हटला की, "घरात पाणी काही झाले नाही, तुझा गांडीत पाणी भरतो" अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिताचे कलम २९४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपींना निर्दोष मुक्त. |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपींवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली तसेच आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीच्या

मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ व २ करीता** :

७. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

८. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ बेबी तुकाराम भट (फिर्यादी) हिला निशाणी क्र.०२ पुढे तपासले आहे. तिने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ती आरोपींना ओळखते. ते तिच्या घराजवळ राहतात. ते त्यावेळी बांधकाम करत होते. समोर मकान बांधत असतांना त्यांचे पाणी तिच्या घरात येते असे तिने त्यांना म्हटले. घटना दोन वर्षापूर्वीची आहे. ती आरोपींना पाणी तिच्या घरात येते असे म्हटल्यानंतर “घरातच नाही तर तुझ्या ढुंगणात घालीण, तुझ्याच्याणी काय होते, साले माजरचोद करुन घे”, तसेच आरोपी निशीकांत पांडुरंगजी वाहीलकर हा बोट वाकडे करुन तिच्या अंगावर आला व “हेकडे बोटे करुन तुझ्या ढुंगणात घालीण” असे म्हणाला. चेतन नावाच्या मुलाने थापड घेवुन तिच्या अंगावर आला. त्यावेळी तिला अवघडे नावाच्या मिस्त्रयाने मागे ओढले. त्यानंतर तिने वळण टाकले. त्यानंतर ती त्यांना शिव्या दिल्या व त्यांनी पुन्हा तिला शिव्या दिल्या. बबलू नावाच्या व्यक्ती दारु पिउन आला व “मी तुला झवून काढतो” असे म्हणाला. बबलू ने स्वतःचे कपडे उतरविले व “ये, मी तुला झवून काढतो” म्हणाला. तिची दांदरली व ती तिच्या मुलीला बोलवायला गेले, तेव्हा त्यातील विशाल

नावाच्या मुलाच्या घरात सर्वजण लपून बसले. त्यानंतर ती व तिच्या मुलीने आरोपींना घरातुन हाका मारल्या. तिने सेलू पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली. सदरचा रिपोर्ट फिर्यादीने शाबित केला.

९. आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, तिला घटनेची तारीख आठवत नाही. आरोपीचे नवे बांधकाम चालू होते, तेथे आरोपीचे पुर्वीचे जुने घर होते, तेच पाडून नवीन बांधकाम केले. ती राहत असलेला घर तिच्या भावाचा आहे. आरोपींना सार्वजनिक रस्त्यावर येण्यासाठी कुरसंगेची दोन घरे पार करुन यावे लागते. आरोपींच्या विधीज्ञांनी विचारलेल्या इतर सूचक प्रश्नांना फिर्यादीने नाकारार्थी उत्तर दिले आहे. परंतु फिर्यादीने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, कोणतीही घटना घडली नसतांना तिने आरोपींविरुद्ध रिपोर्ट दिली.

१०. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोपीत गुन्हे सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांना तपासलेले आहे. सदरच्या साक्षीदाराने त्यांच्या जबाबात कथन केले की, ते आरोपींना व फिर्यादीला ओळखते. पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. त्यांना पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपींतर्फे घेतलेल्या उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, त्याला पंचनामाची तारीख आठवत नाही. तसेच सदरच्या साक्षीदाराने हे ही मान्य केले आहे की, पोलीसांनी त्याला पंचनाम्याकरिता पत्र दिले नव्हते व

पोलीसांनी सर्व लिहून आणले होते आणि भट यांच्या घरी बसून सह्या केल्या होत्या.

११. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांनी त्यांच्या जबाबात कथन केले की, ते आरोपींना ओळखते. पोलीसांनी त्यांना वडगाव कला येथे बेटी भट यांच्या घरी वडगांव कला येथे दि.२३/०५/२०२० रोजी दुपारी १२.०० ते ०१.०० वाजताच्या दरम्यान पंचनामा करण्याकरिता बोलविले होते. पोलीसांना घटनास्थळ फिर्यादी बेबी भट हिने दाखविले होते. त्यावेळी पोलीसांना बेटी भट हिला विचारपूस करुन त्या ठिकाणी पंचनामा तयार केला. त्यावर त्यांची सही घेतली. त्यावेळी दुसरे पंच लक्ष्मण कुमरे हे सुद्धा हजर होते. त्यांना घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु उलटतपासामध्ये सदरचे साक्षीदाराने मान्य केले आहे की, त्यांचे घर वडगांव कला या गावाच्या बाहेर आहे. फिर्यादी बेबी हिच्यासोबत त्यांची जुनी ओळखी आहे. फिर्यादी बेबी भट यांनी त्यांना सांगितले होते की, पोलीस जे लिहून आणतील त्यावर त्यांना सही करायची आहे. फिर्यादीसोबत चांगले संबंध असल्याने त्यांनी त्यावर सही केली होती. त्यांना पंचनाम्यात काय लिहिले आहे ते माहित नाही असे सदरच्या साक्षीदाराने त्यांच्या पुराव्या सांगितलेले आहे.

१२. वरील सर्व साक्षीपुरावे, कागदोपत्री पुरावे व युक्तीवाद यांचा एकत्रित व सखोल विचार केल्यास असे आढळून येते की, अभियोगपक्षाची

केस ही मुख्यतः फिर्यादी बेबी तुकाराम भट (सा.क्र.१) हिच्या साक्षींवर आधारित आहे. अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ हिने तिच्या साक्षमध्ये आरोपींनी सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्याचे व घटनेच्या वेळी तिथे कोण कोण उपस्थीत होते याबाबत सांगितलेले नाही. तसेच अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ फिर्यादीने हिने तिच्या उलटतपासात मान्य केले आहे की, कोणतीही घटना घडली नसतांना तिने आरोपींविरुद्ध रिपोर्ट दिली. त्यामुळे प्रस्तुतच्या घटनेवर संशय निर्माण होते. अभियोगपक्षाने एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाही. अभियोगपक्षाने दोन घटनास्थळ पंच साक्षीदार तपासले असुन त्यातील साक्षीदार क्र.२ ने त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांना पंचनामाची तारीख आठवत नाही. पोलीसांनी सर्व लिहून आणले होते, भट यांच्या घरी बसून सह्या केल्या होत्या. तसेच अभियोगपक्ष साक्षीदार क्र.३ हे सुद्धा पंच साक्षीदार असुन त्यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, फिर्यादी बेबी हिच्यासोबत त्यांची जुनी ओळखी आहे. फिर्यादी बेबी भट यांनी त्यांना सांगितले होते की, पोलीस जे लिहून आणतील त्यावर त्यांना सही करायची आहे. फिर्यादीसोबत चांगले संबंध असल्याने त्यांनी त्यावर सही केली होती. त्यांना पंचनाम्यात काय लिहिले आहे ते माहित नाही. त्यामुळे सदरचे दोन्ही पंच साक्षीदारांचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही. तसेच अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार व तपासी अंमलदार यांना तपासले नसल्यामुळे आणि फिर्यादीने तिच्या साक्षीमध्ये घटना न घडल्याचे सांगितले असल्यामुळे आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व निर्विवाद पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच प्रस्तुतचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता फक्त

शिवीगाळ करणे, अपमानास्पद किंवा बदनामीकारक शब्द बोलणे पुरेशी होत नाही. गुन्हा सिद्ध होण्याकरिता त्या शब्दामुळे इतरांना त्रास झाला हे ही सिद्ध होणे गरजेचे असते. कलम २९४–ब मधील असलेली तिची कसोटी अशी आहे की, त्या शब्दांमुळे लोकांच्या मनात वाईट परिणाम होतो का आणि ते अनैतिक वर्तणाकडे हे पाहिले जाते.

१३. परंतु उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता वरील चर्चेप्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपींविरुध्द भादंविचे कलम २९४, ५०६ चा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळकरुन जिवे मारण्याची धमकी दिली, ही बाब पुराव्यानिशी निसंशयपणे सिध्द करणेची जबाबदारी सरकारपक्षाची होती. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे अभियोगपक्ष आरोपींविरुद्ध शिवीगाळीचा गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. अभियोगपक्षाने तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नसल्यामुळे तपासातील भरपूर सा–या गोष्टया सिद्ध झालेले नाही. त्याचप्रमाणे, अभियोगपक्षाने इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाही व फिर्यादीला आरोपीनींही जिवे मारण्याची धमकी दिल्याची साक्ष अभिलेखावर आलेली नाही. जरी प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीचे आरोपींसोबत वाद झाल्याचे मान्य केले तरी आरोपींवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपींनी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची

बाब पुराव्यानिशी सिद्ध झाली असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींनी भादंविचे कलम २९४, ५०६ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ व २ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत :**

**१४.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **पांडुरंग नारायण वाहीलकर**, आरोपी क्र.२ **ज्ञानेश्वर उर्फ बबलू नारायण वाहीलकर** व आरोपी क्र.३ **निशीकांत पांडुरंग वाहीलकर** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र.२१८/२०२० भारतीय दंड विधान कलम २९४ व ५०६ सहकलम ३४, पोलिस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात येते.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.07 16:41:16 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : ०७/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)